## प्रेसनोट दि. २६.०८.२०२०

सौ. अंजना महेंद्र पाटील वय ५१ वर्ष, तलाठी दुधगाव, ता.मिरज जि. सांगली रा. दुर्वांकुर आपार्टमेंट, टी ४, खणभाग, पंचमुखी मारुती रोड सांगली यांना ९०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी त्यांचे दुधगाव येथील शेतजमीन खरेदी दस्ताची सात बारा नोंद होणेकरीता गावकामगार तलाठी दुधगाव यांचे कडे अर्ज केला होता. सदर खरेदी दस्ताची सात बारा नोंद घेणेकरीता गावकामगार तलाठी सौ. अंजना महेंद्र पाटील तलाठी दुधगाव, यांनी तक्रारदार यांचेकडे १००००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.२५.०८.२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक २६.०८.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये सौ.पाटील तलाठी दुधगाव यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे खरेदी दस्ताची सात बारा नोंद करणे करीता प्रथम १००००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोड अंती ९०००/- रुपये लागलीच घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच दुधगाव तलाठी कार्यालय या ठिकाणी सापळा लावला असता सौ. अंजना महेंद्र पाटील वय ५१ वर्ष, तलाठी दुधगाव, ता.मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ९०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सौ. अंजना महेंद्र पाटील वय ५१ वर्ष, तलाठी दुधगाव, ता.मिरज जि. सांगली यांचे विरुध्द सांगली ग्रामीण पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी अविनाश सागर, सुहेल मुल्ला, धनंजय खाडे संजय संकपाळ, भास्कर भोरे, प्रितम चौगुले, सलिम मकानदार, सिमा माने, विणा जाधव, अजित पाटील चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रार असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in